मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी चिंचवड पोलिसांचा बुलेट राजांना दणका

## 4 हजार 853 बुलेट चालकांविरोधात गुन्हे दाखल : 542 सायलेन्सरवर फिरवला 'बुलडोझर'

**पिंपरी | प्रतिनिधी**

फटाक्यांसारखा आवाज वाढवून शहराची शांतता भंग करणाऱ्या व ध्वनी प्रदूषण वाढविणाऱ्या तब्बल ४ हजार ८५३ बुलेट चालकांविरोधात गुन्हे दाखल करून तब्बल ४८ लाख ४९ हजार रुपये इतकी दंडात्मक कारवाई पिंपरी चिंचवड पोलिसांकडून करण्यात आली होती. ही कारवाई १ जानेवारी ते १० एप्रिल २०२५ या कालावधीत केली आहे. दरम्यान जप्त केलेल्या ५४२ बुलेटच्या सायलेन्सरवर पोलिसांनी बुलडोझर फिरवून बुलेट राजांना मोठा दणका दिला आहे.



पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत वाहनामध्ये अनाधिकृत हस्तक्षेप करून विशेषतः बुलेट मोटारसायकलचे सायलेन्सर बदलून कर्णकर्कश आवाज करणाऱ्या वाहन चालकांवर पिंपरी चिंचवड वाहतुक शाखे अंतर्गत वाहतुक विभागांकडून नियमितपणे कारवाई करण्यात आली. १ जानेवारी ते १० एप्रिल २०२५ रोजी पर्यंत अनाधिकृतपणे वाहनामध्ये हस्तक्षेप करणाऱ्या वाहन चालकांवर एकूण ४ हजार ८५३ केसेस करून तब्बल ४८ लाख ४९ हजार रुपये एवढी दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

पिंपरी चिंचवड पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर नुकतीच पोलीस निरीक्षक, विश्वजीत खुळे, निगडी वाहतूक विभाग यांच्या उपस्थितीत जप्त करण्यात आलेल्या ५४२ सायलेन्सरवर रोड रोलर फिरवून ते नष्ट करण्यात आले.

# चाकण दरोडा प्रकरणात पोलिसांची मोठी कारवाई

## अहिल्यानगर आणि बीड जिल्ह्यात 15 दिवस ट्रॅप लावून सहा जणांना पकडले

**पिंपरी | प्रतिनिधी**

बहुल (ता. खेड) गावात झालेल्या दरोड्याच्या गुन्ह्यातील मुख्य आरोपीला चाकण पोलिसांनी यापूर्वी अटक केली होती. इतर आरोपींना अटक करण्यासाठी चाकण पोलिसांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा, पारनेर, नगर तालुका, बीड जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा येथे १५ दिवस ट्रॅप लावून सहा जणांना पकडले आहे. त्यात एका अल्पवयीन मुलाला देखील ताब्यात घेण्यात आले आहे.



परश्या गौतम काळे, भीमा आदेश काळे, धंग्या चंदर भोसले, राजेश अशोक काळे, अक्षय ऊर्फ किशोर हस्तलाल काळे, अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. एका अल्पवयीन मुलाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मुख्य आरोपी सचिन चंदर भोसले याला पोलिसांनी ३ मार्च रोजी अटक केली आहे. आरोपींकडून १२ लाख रुपये किमतीचे १३ तोळे सोन्याचे दागिने, रोख रक्कम, तीन दुचाकी, हत्यारे, असा एकूण १५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींनी चाकण पोलिस ठाण्याच्या हद्दीत सहा दरोडे घातल्याचे उघडकीस आले आहे. २४ फेब्रुवारी रोजी पहाटे बहुळ गावातील फुलसुंदर वस्ती येथे जयराम लक्ष्मण वाडेकर यांच्या घराचा दरवाजा तोडून पाच ते सहा दरोडेखोरांनी घरात प्रवेश करून जयराम यांचा मुलगा अशोक आणि त्यांची पत्नी उज्ज्वला यांच्या पोटात चाकू, तलवारीने वार केले. दरोड्याच्या घटनेतील आरोपी पुन्हा दरोडा टाकण्यासाठी चिंचोशी गावात आले असल्याची माहिती मिळाल्यावर उपायुक्त शिवाजी पवार, सहायक निरीक्षक प्रसन्न जऱ्हाड यांना मिळाली. पोलिसांनी सापळा रचून दरोडेखोर टप्प्यात येताच अटक करण्यासाठी पोलिस सरसावले असता एका दरोडेखोराने पोलिसांवर हल्ला केला. या हल्ल्यात पोलिस उपायुक्त शिवाजी पवार आणि सहायक पोलिस निरीक्षक प्रसन्न जऱ्हाड हे जखमी झाले होते.

### सोनार आणि नातेवाइकालाही अटक

» आरोपींकडून चोरीचे दागिने खरेदी करणारा सोनार अभय विजय पंडित (३८, श्रीगोंदा, अहिल्यानगर) याला पोलिसांनी अटक केली. आरोपी सचिन भोसले याचा नातेवाईक गणेश शिवाजी काळे (श्रीगोंदा, अहिल्यानगर) याने आरोपींना आश्रय दिला. त्यामुळे गणेश काळे याला देखील अटक केली आहे.

# डीपीसीतील कामे जुलैअखेर सुरू करा

## सप्टेंबर ते डिसेंबरदरम्यान विकासकामे पूर्ण करावीत : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत २०२५-२६ वर्षीच्या कामांना मे महिन्यात प्रशासकीय मान्यता देऊन येत्या जून-जुलैमध्ये निविदा काढून संबंधितांना कार्यारंभ आदेश द्यावेत. तसेच सप्टेंबर ते डिसेंबरदरम्यान विकासकामे पूर्ण करावीत. डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण झालेल्या कामांची गुणवत्ता तपासणी जानेवारी, फेब्रुवारी व मार्च २०२६ या तीन महिन्यांत करायची आहे. काही कामांची तपासणी करण्यात येईल, असे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी प्रशासनाला दिले आहेत.



जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत २०२४-२५ या वर्षीच्या कामकाजांचा आढावा आणि २०२५-२६ या वर्षात करण्यात येणाऱ्या कामाबाबत डुडी यांनी मंगळवारी (दि. १५) आढावा घेतला. त्यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर उपस्थित होते.

डुडी म्हणाले, “२०२४-२५ मधील कामे मुदतीत पूर्ण करण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करा. जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील कामे ऑगस्टपर्यंत पूर्ण करावीत. २०२४-२५ चा निधी शंभर टक्के खर्च करण्यात आला आहे. डीपीसीतील २०२५-२५ या आर्थिक वर्षात कामे सुचविताना स्थानिक लोकप्रतिनिधींशी चर्चा करूनच कामे सुचवा. ज्या जागांचे मालमत्तापत्रक वादविरहित आहे, अशाच मालकीच्या जागांवरच कामे सुचविण्यात यावी. २०२५-२६ या आर्थिक वर्षातील कामांसाठी ३१ मेपर्यंत सर्व प्रशासकीय मान्यतांची प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच जून, जुलैदरम्यान निविदा आणि कार्यारंभ आदेश द्यावेत. येत्या सप्टेंबर ते डिसेंबरपर्यंत कामांची गुणवत्ता राखून कामे पूर्ण करावीत.”

जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील इमारत वगळता जनसुविधा, नागरी सुविधांच्या पूर्ण कामांसाठी निधी उपलब्ध करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. आतापर्यंत डीपीसीची बैठक उशिरा होत असे. यावर्षी नियमित वेळेत बैठक झाली असून डीपीसीच्या निधी खर्चाच्या कार्यपद्धतीत पालकमंत्री अजित पवार यांनी बदल सुचविले आहेत. त्यामुळे मार्चपर्यंत निधी खर्च करण्याऐवजी डिसेंबरपर्यंत निधी खर्च करून काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे डिसेंबरपर्यंत कामे पूर्ण झाल्यानंतर जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांत त्रयस्थ संस्थेकडून कामांची गुणवत्ता तपासण्याचे आदेश देण्यात आले आहेत. डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण झालेल्या कामांची गुणवत्ता तपासणी जानेवारी, फेब्रुवारी व मार्च २०२६ या तीन महिन्यांत करायची आहे. काही कामांची तपासणी करण्यात येईल. नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत प्रत्येक विभागाने एक प्रस्ताव नियोजन विभागास सादर करावा. यात नावीन्यपूर्ण कामांचा समावेश असावा, असेही त्यांनी सांगितले.

# ‘ससून’च्या अहवालानंतर मंगेशकर रुग्णालयावर कारवाई

## पुणे धर्मादाय आयुक्त आणि पुणे महापालिकेच्या माता-मृत्यू विभागाचे अहवाल राज्य शासनाला सादर

**पुणे | प्रतिनिधी**

‘ईश्वरी (तनिषा) भिसे मृत्यूप्रकरणात आतापर्यंत राज्य आरोग्य विभाग, पुणे धर्मादाय आयुक्त आणि पुणे महापालिकेच्या माता-मृत्यू विभागाचे अहवाल राज्य शासनाला सादर करण्यात आले आहेत. ससून रुग्णालयाच्या समितीचा चौथा अहवालही लवकरच पाठवला जाईल. त्यानंतरच दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर गुन्हा दाखल करण्याचा किंवा कारवाई करण्याचा निर्णय घेतला जाईल,’ असे स्पष्टीकरण राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी मंगळवारी पुण्यात दिले.




> संबंधित प्रकरणानंतर पोलिसांकडून पत्र प्राप्त होताच समिती स्थापन केली आहे. या समितीचा अहवाल पूर्णत्वाच्या दिशेने असून, रात्री उशिरापर्यंत राज्य सरकारकडे पाठविण्यात येईल. ससूनची समिती उपचारामध्ये हलगर्जीपणा झाला आहे किंवा नाही एवढेच पाहते. त्यासाठी सर्व कागदपत्रे आम्ही तपासून पाहिले आहेत.
>
> **- डॉ. एकनाथ पवार, अधिष्ठाता, ससून रुग्णालय.**

दरम्यान, पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या हलगर्जीपणाबद्दल आणि डॉ. सुश्रुत घैसास यांच्यावर ठपका ठेवण्यात आला आहे. मात्र, दीनानाथ रुग्णालय स्वत:ला वाचवण्यासाठी प्रयत्न करत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात राज्य महिला आयोगाच्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत चाकणकर बोलत होत्या. ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार, पुणे शहर गुन्हे विभागाचे उपायुक्त निखील पिंगळे तसेच भरोसा सेलचे सदस्य उपस्थित होते.

चाकणकर म्हणाल्या, ‘दीनानाथ रुग्णालयातील गर्भवती ईश्वरी (तनिषा) भिसे मृत्यूच्या घटनेनंतर ससून रुग्णालयाच्या गठीत समितीची आज आढावा बैठक पार पडली. या समितीने केलेला अहवाल राज्य सरकारला रात्री उशिरापर्यंत सादर करण्यात येणार आहे. मात्र, भविष्यात असे गैरप्रकार घडू नयेत, संबंधितांना चांगली जरब बसावी म्हणून कठोर कारवाई करण्याचा आपला प्रयत्न आहे. कोणतेही शासकीय किंवा खासगी रुग्णालय असो, त्यांना शिस्त आणि जरब आणण्यासाठीचा हा प्रयत्न असेल.’

अत्याचाराच्या घटनेत पीडित महिलेच्या वैद्यकीय तपासणीला कोण कोण उपस्थित होते, महिलेची तपासणी कोणी करावी, या अनुषंगाने समितीने पडताळणी केली आहे. समितीने नियमावली सादर केली असून, अधिष्ठाता, पोलीस प्रतिनिधी, स्त्री-रोग तज्ज्ञ, न्याय वैद्यकीय विभागाचे प्रमुख आणि शस्त्रक्रिया विभागाचे प्रमुख उपस्थित राहावे, असे अहवालात नमूद केले असल्याचे चाकणकर यांनी सांगितले.

# नदी स्वच्छता आंदोलनाबाबत कारभाऱ्यांचे मौन

## शहरासाठी नागरिक एकवटताहेत मात्र लोकप्रतिनिधींचा कानाडोळा; राजकारण बाजूला ठेवण्याचे केले आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

आम्हाला नदीसुधार प्रकल्प नको, आम्हाला नदी उगमापासून संगमापर्यंत स्वच्छ हवी. नदीसुधार प्रकल्पाच्या नावाखाली जी झाडांची कत्तल सुरु आहे, ती त्वरित थांबववण्याची मागणी करत पिंपरी-चिंचवड महापालिका नदी पुनरुज्जीवन समितीच्या माध्यमातून हजारो पिंपरी-चिंचवडकर रस्त्यावर उतरले आहेत. त्याचवेळी शहराती सर्वच लोकप्रतिनिधींनीही मात्र या लोकचळवळीकडे कानाडोळा केला असल्याचे स्पष्ट झाले आहे. महापालिका आयुक्त शेखर सिंह हे समितीच्या पदाधिकाऱ्यांना वेळ देण्यास तयार नाहीत. तर दुसरीकडे शहरातील सत्ताधारी पक्षाचे पाच आमदार आणि खासदार समितीच्या खांद्याला खांदा लावून रस्त्यावर उतरणे आवश्यक असताना फक्त आश्वासनापलीकडेच काहीच करत नसल्याची भावना निर्माण झाली आहे.

केंद्र शासनाने मुळा, पवना, इंद्रायणी नदीसुधार प्रकल्प हाती घेतला आहे. त्यासाठी ३ हजार ४०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. या प्रकल्पाच्या माध्यमातून पिंपरी-चिंचवड महापालिकेच्यावतीने काम सुरुवात केली आहे. त्यासाठी नदीकाठावरील झाडांची कत्तल सुरु केली आहे. नदी प्रदूषित करण्यात महापालिकेचा मोठा वाट आहे. शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया न करताच एसटीपीमधील पाणी प्रक्रिया न करताच ते नदीत सोडण्यात येत आहे. अनेक ठिकाणी ड्रेनेजमधून दूषित पाणी सरळ नदीत सोडण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे शहरवासीयांनी नदी स्वच्छतेसाठी मोठी मोहीम उघडून आम्हाला नदीसुधार प्रकल्प नको, आम्हाला नदीच्या उगमापासून ते संगमापर्यंत नदी स्वच्छ हवी, असा आग्रह धरला आहे. नदीकाठच्या झाडांची कत्तल करू नका, त्यामुळे त्यावर अवलंबून असणारे घटक यांचे मोठे नुकसान होत आहे, त्याचा विचार करून या प्र कल्पाला स्थगिती द्या, अशी मागणी केली होती.



### पदाधिकाऱ्यांची पिंपरी-चिंचवडकरांच्या मागणीकडे पाठ

» पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वच राजकीय पक्षातील खासदार, आमदार आणि पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन नदी वाचवण्यासाठी आणि तिचे आहे त्या परिस्थितीत संगोपन करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका नदी पुनरुज्जीवन समिती स्थापन करून लढा उभा केला आहे. पालिका आयुक्तांवर दबाव टाकावा, अशी मागणी या पदाधिकाऱ्यांकडे लावून धरली होती; मात्र, संबंधित राजकीय पदाधिकाऱ्यांनी समितीला फक्त आश्वासनापलीकडे काहीच मदत केली नाही. आयुक्त समितीला वेळ देत नाहीत, हे उघड झाले आहे. त्यात शहरातील लोकप्रतिनिधींना नागरिकांची चिंता नाही, हेही आता स्पष्ट होत चालले आहे.

> शहरातील पवना, इंद्रायणी आणि मुळा नदी स्वच्छ झाली तर त्याचा फायदा हा सर्व शहरवासियांबरोबरच येथे राहणाऱ्या राजकीय पदाधिकाऱ्यांनाही होणार आहे. तेही याच शहरात लहानाचे मोठे झाले आहेत. त्यांच्या लहानपणी नदी किती स्वच्छ होती हे त्यांनी स्वतःच्या डोळ्यांनी पहिले आहे. आता नदीसुधार प्रकल्पाच्या नावाखाली नदीजवळची जैवविविधता नष्ट करण्याचा घाट घालण्यात आला आहे. त्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी राजकरण बाजूला सारून आमची भूमिका आयुक्तांना समजून सांगण्याच्यादृष्टीने फक्त आयुक्तांची वेळ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला तर निश्चित त्यांचाही हातभार लागेल.
>
> **- संतोष माचुत्रे, पिंपरी-चिंचवड महापालिका नदी पुनरुज्जीवन समिती**

> पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नाकर्तेपणामुळे नदी प्रदूषित झाली आहे. इंद्रायणी काठावर येणार लाखो वैष्णव येथील पाणी तीर्थ म्हणून प्राशन करत होते. आता त्या पाण्याची अवस्था पाहता हे तीर्थ जणू विषच झाल्याचे पाहवयास मिळत आहेत. आम्ही सर्वसामान्य नागरिकांनी नदी स्वच्छ आणि सुंदर व्हावी यासाठी लढाई सुरु केली आहे. काही झाले तरी आम्ही यात मागे सरणार नाही. त्यासाठी कोणत्या राजकीय पदाधिकाऱ्यांनी साथ दिली तरी चालेल अन्यथा आम्ही आमची लढाई लढणार आहोतच. सत्ताधारी पाच आमदार आहेत. दोन खासदार आहेत. तरीही आयुक्तांना भेटण्यासाठी आम्हाला प्रयत्नांची पराकाष्ठा करावाई लागत आहे. त्यामुळे भूमिपुत्र असणाऱ्या आमदार, खासदारांनी आम्हाला साथ नाही दिली तरी आम्ही भविष्यासाठी ही लढाई सुरूच ठेवणार आहोत.
>
> **- तुषार शिंदे , पर्यावरण प्रेमी, पिंपरी-चिंचवड महापालिका नदी पुनरुज्जीवन समिती**

# महिंद्रा अँथिया सोसायटीत भटक्या श्वानांवर विषप्रयोग

## नऊपैकी तीन श्वानांचा मृत्यू झाला असून आता याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील महिंद्रा अँथिया सोसायटीमध्ये भटक्या श्वानांवर विषप्रयोग करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. यातील तीन श्वानांचा मृत्यू झाला असून आता याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी संत तुकाराम नगर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीवर बीएनएएस ३२५ आणि प्राण्यांवरील क्रुरतेविरोधातील कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवारी (दि. १३) रात्री उशिरा हा प्रकार घडला आहे. पिंपरी-चिंचवडमधील मुख्य चौकात ही गृहरचना संस्था आहे. मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय लोकांची गृहरचना संस्था म्हणून ही सोसायटी ओळखली जाते. गेल्या काही दिवसांपासून येथील भटक्या श्वानांना खायला घालण्यावरून दोन गट पडले आहे.

चार दिवसांपूर्वी याच सोसायटीतील काही नागरिकांनी महापालिकेच्या पशु वैद्यकीय विभागात जाऊन तक्रार केली होती. सोसायटीतील भटक्या श्वानांमुळे आम्हाला खाली जाणे अवघड झाले आहे. लहान मुलांना खेळायला पाठवताना अडचणी येत आहेत. वृद्ध नागरिकांवर या श्वानांकडून हल्ले होत आहेत. वाहनांचे नुकसान होत आहे, अशी तोंडी तक्रार येथील नागरिकांनी पशु वैद्यकीय विभागात केली होती. त्यानंतर रविवारी रात्री उशिरा या सोसायटीच्या आवारातील भटक्या श्वानांना खायला घालताना त्यात विषप्रयोग करण्यात आला.

प्राणीहक्क कार्यकर्त्यांनुसार, सोसायटीच्या परिसरात एकूण अकरा भटक्या श्वानांना अज्ञात व्यक्तींनी विष मिसळलेले अन्न दिले. त्यातील तीन श्वान मरण पावली असून उर्वरित सहा श्वानांची प्रकृती गंभीर आहे. मृत श्वानांचे मृतदेह औंध येथील शासकीय पशुवैद्यकीय रुग्णालयात तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. दोन श्वानांचे शवविच्छेदन रविवारी करण्यात आले असून नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले आहेत. सोसायटीतील रहिवासी व प्राणीप्रेमी मनीष सिंग यांनी काही भटक्या श्वानांना उलटी, जुलाब व शुद्ध हरपण्यासारखी लक्षणे आढळली. आम्ही त्वरित आजारी श्वानांना काळेवाडी येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात नेले, त्यांना अँटिडोट व औषधे देण्यात आली. सोसायटीचे क्षेत्र खूप मोठे असल्यामुळे किती श्वानांना विषबाधा झाली आहे आणि किती मरण पावले, हे समजणे कठीण आहे. मात्र, यासंदर्भात संत तुकारामनगर पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे,



### या आहेत प्राणीमित्रांच्या मागण्या...

- » विषप्रयोग झालेल्या श्वानांवर तातडीने वैद्यकीय उपचार व्हावेत.
- » जे व्यक्ती जबाबदार आहेत त्यांच्या विरोधात कडक पोलीस कारवाई व्हावी
- » फिडर व्यक्तीला ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार संरक्षण मिळावे.
- » सोसायटीमध्ये प्राणी संरक्षणाचे कायदे काटेकोरपणे लागू करावेत.

> नऊ श्वानांवर विषप्रयोग करण्यात आल्याची प्राथमिक तक्रार प्राप्त झाली आहे. यातील तीन श्वानांचा मृत्यू झाला असून, अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपासानंतरच हा प्रकार कोणी केला हे स्पष्ट होईल.
>
> **-वनिता धुमाळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, संत तुकाराम नगर**

# अभय योजनेने 20 कोटींची थकबाकी माफ

## इंदापूर शहर नागरी संघर्ष समितीच्या आंदोलनाला यश

**पुणे | प्रतिनिधी**

सरकारचा नगरपालिका व्याज थकबाकी वसुलीसाठी अभय योजना लागू करण्याचा निर्णय झाल्याने, इंदापूर शहर नागरी संघर्ष समितीच्या आठ वर्षाच्या आंदोलनाला घवघवीत यश मिळाले आहे.संघर्ष समितीच्या आंदोलनामुळे नगरपरिषद नगरपंचायत औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ मध्ये सुधारणा होणार असून,संपूर्ण राज्यांत नगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या मालमत्ता धारकांना,या निर्णयाचा फायदा होणार असल्याने,इंदापूर शहरातील नागरीकांनी आनंद व्यक्त केला आहे.तर राज्यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन नागरी संघर्ष समितीकडून करण्यात आले आहे.

इंदापूर नगरपालिका एक एप्रिल २०१७ पासून थकीत घरपट्टी पाणीपट्टी वरती २४% व्याज आकारत होती.सदर व्याज भरणे नागरिकांना शक्य नव्हते त्यामुळे नागरिकांकडून,मालमत्तेसंबंधी संकलित कर भरला न गेल्यामुळे,शहरात २० कोटी रुपयांच्या आसपास थकीत रक्कम झाली.नगरपालिका नागरिकांवरती दडपशाही करून कर वसूल करण्याचा प्रयत्न करू लागली. याविरुद्ध इंदापूर शहरातील नागरिकांनी एकत्र येऊन इंदापूर शहर नागरी संघर्ष समितीची स्थापना करून,शहराचे अत्यावश्यक गरजांचे २८ प्रश्न मांडून आंदोलन सुरू केले.

२७ मार्च २०२३ रोजी या आंदोलनाचे रूपांतर धरणे आंदोलनामध्ये झाले. संघर्ष समितीचे अनेक नेते, पदाधिकारी,अधिकारी,कायदेतज्ञ , पत्रकार यांच्या भेटी घेऊन नागरिकांच्या व्यथा मांडल्या. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ,उपमुख्यमंत्री नगर विकास राज्यमंत्री यासह अनेक आजी-माजी लोकप्रतिनिधींच्या भेटी घेतल्या.परंतु भरीव आश्वासन न मिळाल्यामुळे,संघर्ष समिति आंदोलन करीत राहिली.संघर्ष समितीच्या आंदोलनाची दखल घेऊन पाच डिसेंबर २०२३ रोजी महाराष्ट्र शासनाने घरपट्टी व्याज पाणीपट्टी व्याज व इतर थकबाकी माफीसाठी नगरपालिकेला अधिकार प्रदान व्हावेत, या दृष्टीने महापालिका कायद्याप्रमाणे नगरपालिकेलाही व्याजमाफीचे अधिकारी यावेत या दृष्टीने परिपत्रक काढले.

त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी नऊ जानेवारी २०२५ रोजी बैठक करून शासनाने करावयाच्या शंभर दिवसाच्या कामांमध्ये व्याजमाफीसाठी व थकबाकी माफीसाठी २९ जानेवारी रोजी परिपत्रक काढून,नगर विकास संचालक रानडे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली ८ सदस्यांची समिती स्थापन केली.या समितीने २०फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र शासनाला अभय योजना लागू करण्यासंबंधी सकारात्मक अहवाल दिला.व सदरच्या समितीचे प्रमुखांनी संघर्ष समितीला २७ मार्च रोजी पत्र पाठवून तसे कळवले. अशी माहिती संघर्ष समितीचे प्रमुख कृष्णाजी ताटे,हमिद अत्तार,महादेव चव्हाण यांनी दिली.



### “इंदापूरात फटाके वाजले ”

» शासनाने नगरपरिषदेच्या बाबतीत महत्वाचा निर्णय घेतला.या अभय योजनेप्रमाणे लोकांना जास्तीत जास्त आर्थिक फायदा कसा होईल.यासंबंधी प्रयत्न करणार असल्याचे नागरी संघर्ष समितीने सांगितले. तसेच इतर जे २७ प्रश्न आहेत आणि जे प्रलंबीत प्रश्न राहिले आहेत.त्यासंबंधी ही शासनाने दखल घेतली असून अनेक प्रश्न लवकरच मंजूर होण्याच्या मार्गावर आहेत.तरीपण शेवटचा प्रश्न जोपर्यंत सुटत नाही. तोपर्यंत संघर्ष समितीचे कार्यकर्ते बेमुदत धरणे आंदोलन करतच राहणार आहेत.हा निर्णय प्रसिद्ध झाल्यानंतर,इंदापूर शहरातील असंख्य नागरिकांनी इंदापूर शहर नागरी संघर्ष समितीचे अभिनंदन केले. संघर्ष समितीवर अभिनंदनचा वर्षाव होत असून संघर्ष समितीने फटाके वाजवून या निर्णयाचे स्वागत केले.

### “20 कोटी रुपये थकबाकी ”

» . इंदापूर नगरपालिका पालिकेची नागरिकांकडे २० कोटी रुपये थकबाकी आहे शासनाच्या या निर्णयामुळे शहरवासीयांना या निर्णयाचा फायदा होणार असून,सदरचा निर्णय लोकहिताचा सर्वसामान्य गरीब झोपडीत राहणाऱ्या गरीब माणसापासून ते श्रीमंत माणसापर्यंत प्रत्येकाला फायदा होणार आहे.अशी प्रतिक्रिया इंदापूर शहर नागरी संघर्ष समितीचे प्रा.कृष्णाजी ताटे यांनी दिली.

# भाटघरमध्ये व्हायटिंग लेकचे लवकरच दर्शन

## धरणाच्या गेटमधून प्रवेश बंदी असल्याने लांब पल्ल्यावरुन पाहता येणार

**पुणे | प्रतिनिधी**

सद्यस्थितीला भाटघर धरणात ३० टक्के एवढा पाणीसाठा उपलब्ध आहे. धरणातील पाण्याची पातळी कमी झाल्याने भाटघर धरण बांधण्यापूर्वी आतील बाजूस बांधलेले “व्हायटींग लेक” आता दिसू लागले आहे. ते पाहण्यासाठी नागरिक गर्दी करीत आहे. परंतु शासनाच्या आदेशानुसार, भाटघर धरणाच्या उत्तर व दक्षिण बाजूस असणाऱ्या दोन्ही गेटमधून प्रवेश बंदी असल्याने धरण बॅकवॉटरच्या लांब पल्ल्यावरून व्हायटींग लेकचे दर्शन घ्यावे लागत आहे.

ब्रिटिश राजवटीत पिण्याच्या पाण्याच्या उद्देशाने व पूर्वेकडील शेती सिंचनासाठी लेक व्हायटींग धरण बांधण्यात आले होते. या धरणाच्या कामाचा शुभारंभ सन १८८१ मध्ये झाला. उत्तर बाजूस संगमनेर (ता.भोर) गावच्या हद्दीपासून ते दक्षिण बाजूस भाटघर (ता.खंडाळा) गावच्या हद्दीत १८ मीटर उंचीची भिंत बांधण्यात आली. या भिंतीचे काम ११ वर्षांनी म्हणजे १८९२ साली पूर्ण झाले. या धरणाला लेक व्हायटींग असे नाव देण्यात आले.

धरणात बुडालेल्या मंदिराचे दर्शन मे महिन्यात भाटघर धरण बांधण्याअगोदर पांडव काळात दक्षिण बाजूस वेळवंड गावच्या हद्दीत नागोबा मंदिर तर उत्तर बाजूस कांबरे गावच्या हद्दीत कांबरेश्वर ही दोन मंदिरे बांधण्यात आली होती. ही दोन्हीही मंदिरे पाऊस पडला की धरणाच्या पाण्यात बुडत असतात. साधारण अकरा महिने ही दोन्ही मंदिरे पाण्याखाली असतात. परंतु मे महिन्यात धरणाची पाण्याची पातळी खालावल्यानंतर ही मंदिरे दिसू लागतात. यावेळी ही मंदिरे बघण्यासाठी पर्यटकांची गर्दी होते.



### मंदिरांचे दर्शन मे महिन्यात...

» भाटघर धरणाची भिंत ही लेक व्हायटींग धरणाच्या भिंतीपेक्षा ३९.९१ मीटर उंच आहे. पावसाळ्यात पाण्याची पातळी लेक व्हायटींग धरणाच्या भिंतीच्या वर गेल्यानंतर लेक व्हायटींग धरण दिसेनासे होते. मात्र दरवर्षी एप्रिल-मे महिन्यात भाटघरच्या पाण्याची पातळी ५.२० टीएमसी पेक्षा कमी झाल्यानंतर लेक व्हायटींग धरण दिसू लागते.

### पाणीसाठा कमी पडू लागल्याने भाटघर धरण बांधले

» लेक व्हायटींग धरणात ५.२० टीएमसी एवढा पाणीसाठा साठू लागला. परंतु या धरणातील पाणी कमी पडू लागल्याने मोठे धरण बांधण्याच्या उद्देशाने धरणाच्या भिंतीलगत पूर्वेला ५७.९१ मीटर उंचीची भिंत बांधण्यात आली. या धरणाचे काम १९२७ मध्ये पूर्ण झाल्यानंतर या धरणाला “भाटघर धरण” (येसाजी कंक जलाशय) असे नाव देण्यात आले. या भाटघर धरणात २३.७४ एवढा पाणीसाठा साठू लागला. लेक व्हायटींग धरणाचे दर्शन एप्रिलच्या अखेरी किंवा मे महिन्यात होते.